नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०४/०३/२०२६ (बुधवार )**

## अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगणाऱ्या अरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ४ आरोपी अटक, देवलापार पोलीसांची कामगिरी अग्निशस्त्र,७ मोबाईल, वाहन असा १२ लाख ३१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ०४/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, चारचाकी वाहन क्रं एम पी २८ सी बी ३००८ मध्ये काही इसम देशी बनावटीचे शस्त्र घेवुन मध्यप्रदेश कडुन नागपुर कडे येत आहे. नमुद माहीती प्राप्त होताच देवलापार पोलीसांनी जुने देवलापार पोलीस स्टेशन शिवणी ते नागपुर एनएच ४४ महामार्गावर नाकाबंदी केली असता पांढऱ्या रंगाची क्रेटा वाहन क्रं एम पी २८ सी बी ३००८ शिवणीकडुन येताना दिसली. वाहनात आरोपी क्रं १) चालक जमाल अहमद जावेद इक्बाल,वय २६ वर्षे, रा. हाफीज मिस्त्री रोड,अन्सार नगर, मोमीन पुरा, महात्मा फुले बाजार, नागपुर ,२) दनिश अब्दुल गफुर आफिदी, वय २५ वर्षे, रा घर क्रं २७, सुभाषचंद्र बोस वार्ड, न्यु आनंद नगर,रझा चौक, आधारताल,जबलपुर, मध्यप्रदेश, मागील सिटवर बसलेले आरोपी ३) शहवाज मेहबुब आलम ,वय ३० वर्षे,रा घर क्रं ७७८, झाकीर हुसेन वार्ड , गोहालपुर नई बस्ती, जबलपुर, मध्यप्रदेश आणि आरोपी क्रं ४) रियाझ महफुज खान, वय २६ वर्षे,रा बोहराबाग गल्ली क्रं १, जबलपुर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पंचासमक्ष वाहनाची आणि आरोपींची झडती घेतली असता चालक जमाल अहमद जावेद इक्बाल याचे कमरेला देशी बनावटीचे पिस्टल ( माउजर) हे अग्निशस्त्र मिळुन आले. अग्निशस्त्राच्या

मॅगझीन मध्ये २ जिवंत काडतुसे मिळुन आली. सदर अग्निशस्त्राच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे जवळ कोणताही परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी बनावटीचे पिस्टल ( माउजर) किंमती ४०,०००/— रूपये, २) २ जिवंत काडतुसे किंमती २०००/— रूपये, ३) ७ मोबाईल किंमती १८९,०००/— रूपये आणि ४) क्रेटा वाहन क्रं एम पी २८ सी बी ३००८ किंमती १०,००,०००/— रूपये असा एकुण १२,३१,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी आरोपींविरूद्ध पोस्टे देवलापार येथे कलम ३/२५ शस्त्र अधिनियम सह कलम ३(५) भान्यासं,सह कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद सर्व आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे. साखळी पुरावे जोडुन पोलीस अधिक तपास करीत आहेत.**



# खून करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजीवन करावासाची शिक्षा

# खुन आणि आत्महत्या करण्याचा प्रयत्न दोन्ही कलमान्वये शिक्षा सुनावाली

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— फिर्यादी नामे सौ. अग्नी उमेस सेनवानी, वय ३५ वर्ष, रा. धर्मापुर जि. राजनांदगाव ह. मु. बिडगणेशपुर ता. हिंगणा, जि. नागपूर यांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे अप क्र. ८९/२०२४ कलम ३०२, ३०९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २६/०२/२०२४ रोजी मौजा बिडगणेशपुर एमआयडीसी बोरी येथे यातील फिर्यादी हिचे घराशेजारी राहणार आरोपी नामे रंजीत नथ्थु चौधरी, वय ४२ वर्ष, रा. पांढुर्णा जि. छिंदवाडा ह. मु. बिडगणेशपुर ता. हिंगणा व मृतक नामे सुनिता सहादेव राऊत, वय ४३ वर्ष, रा. बिडगणेशपुर हिंगणा हे १० वर्षापासुन पतीपत्नीप्रमाणे एकत्र राहत होते. यातील आरोपी याने मृतक श्रीमती सुनिता सहादेव राऊत हिचे सोबत पैशाच्या कारणावरून वादविवाद करून तिचा खुन केला त्यानंतर त्याने स्वत: चाकुने स्वत:चे गळयावर वार करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पोलीसांनी आरोपीवर उपचार करून त्यानंतर त्याला सदर गुन्हयात अटक केले होते.

श्री राजीव कर्मलवार, सहायक पोलीस निरीक्षक पोस्टे एमआयडीसी बोरी यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ०४/०३/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश ०७ श्री. अनिलकुमार शर्मा यांनी **नमुद आरोपी नामे रंजीत नथ्थु चौधरी, वय ४२ वर्ष, रा. पांढुर्णा, जि. छिंदवाडा, राज्य मध्यप्रदेश यास कलम ३०२ भादंवि मध्ये आजीवन कारावास व ५,०००/— रूपये दंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास कलम ३०९ नुसार १ वर्ष साधा कारावास व २०००/—रू दंड, दंड न भरल्यास ०१ महिन्याचा साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री एल.बी शेंद्रे आणि श्रीमती वेदीका पाटील यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर विभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर

ग्रामीण, सपोनि श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, सपोनि श्री विशांत नांदगाये, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ अनिल व्यवहारे, ब. नं. ६२० यांनी मदत केली आहे.

## पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे दिनांक २८/०२/२०२६ रोजी शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले अधिकारी १. पोलीस निरीक्षक, कैलास रामाजी बाराभाई, नेमणूक पोलीस दळणवळण व माहीती तंत्रज्ञान, नागपूर ग्रामीण २. श्रेणी पोउपनि, अरूण बाबुजी फाटे, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ३. श्रेणी पोउपनि, संजय सुखदेवराव खंडारे, नेमणूक पोलीस स्टेशन बुट्टीबोरी, ४. श्रेणी पोउपनि, राजु दल्लु राठोड, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ५. श्रेणी पोउपनि, विवेक पुंडलिकराव दोडके, नेमणूक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला.

श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण आणि श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात मानव संसाधन शाखेच्या पोलीस उपनिरीक्षक, श्रीमती जोत्स्ना गिरी व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.




## दारूच्या नशेत निष्काळजीपणाने वाहन चालवुन सदोष मनुष्यवध करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद चालक आरोपी अटक

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०३/०३/२०२६ रोजी सावनेर पोलीस स्टेशन येथे फिर्यादी गोपाल मोहन टंटेल, वय १९ वर्ष, रा. वार्ड ०९, चिचपूरा सावनेर यांनी फिर्याद दिली की, दिनांक ०३/०३/२०२६ रोजी दुपारी फिर्यादीचे वडील हे होळी सन असल्याने लाकडे आणायला सायकल घेवून निघाले होते दुपारी ०४.०० वा. दरम्यान पांढूर्णा रोड जवळील जयस्वाल पेट्रोल पंप जवळ एका मारोती अलटो कार क्र एम एच ४० बी जे ३२५४ नी जोरदार धडक दिल्याने त्यांचा अपघात झाला त्यामध्ये गंभीर दुखापत होवुन फिर्यादीचे वडील मरण पावले. **आरोपी कार चालक आशिष गजानन मोहतपुरे, वय २४ वर्ष, रा. बाजार चौक,**

**सावनेर याला दारूच्या नशेत वाहन चालविल्याने अपघात होवुन मृत्यु होवु शकतो हे माहीती असतांना सुध्दा त्याने त्याच्या ताब्यातील कार क्र एम एच ४० बी जे ३२५४ दारूच्या नशेत निष्काळजीपणाने चालविल्याने सदर अपघात होवुन फिर्यादीच्या वडीलांचा मृत्यु झाला.**

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपी कार वाहन चालकाविरूद्ध कलम १०५, २८१ भान्यासं २०२३ सहकलम १८४, १८५ मोटर वाहन अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपी कार चालकास अटक करण्यात आली आहे.**

**नागपुर ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मदयपान करून वाहन चालवु नका, स्वतःचा आणि दुसऱ्यांचा जीव धोकयात घालु नका. अन्यथा कठोर कायदेशिर कारवाई ला समोर जावे लागेल.**

## बेपत्ता अल्पवयीन बालकाचा बुटीबोरी पोलीसांनी अवघ्या ३० मिनीटांत घेतला शोध

बुटीबोरी पोलीस स्टेशन अंतर्गत सिडको कॉलनी परिसरातील १६ वर्षीय मुलगा दिनांक २८/०२/२०२६ रोजी घरातून निघून गेला होता. दोन दिवस कुटुंबीयांनी स्वत: सर्वत्र शोधाशोध केली परंतु मुलाचा मिळुन आला नाही. त्यामुळे चिंतेत असलेल्या आई वडिलांनी ०२/०३/ २०२६ रोजी बुटीबोरी पोलीस स्टेशनला सदर माहीती कळविली. बुटीबोरी पोलीसांनी तात्काळ सदर तक्रारीची दखल घेत सदर बेपत्ता १६ वर्षीय अल्पवयीन मुलाबाबत संपूर्ण माहिती घेतली तेव्हा सदर बालकाकडे मोबाईल असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी तात्काळ शोधमोहीम सुरू केली. तांत्रिक पुराव्याच्या आधारे बुटीबोरी पोलीसांनी अवघ्या ३० मिनीटांत बुटीबोरी येथील दुर्गामाता मंदीराच्या मागाच्या बाजुला जावुन सदर बालकाचा शोध घेतला असता तो तिथे मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता त्याच्या

आईने त्याला अभ्यासाच्या कारणावरून रागविल्याने तो घरून निघुन गेल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद अल्पवयीन बालाकाला सुखरूप रित्या त्याच्या पालाकांच्या ताब्यात देण्यात आले. पालकांनी पोलीसांचे आभार मानले.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह बाबत राबविण्यात येत आहे विशेष मोहीम
## ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह च्या एकुण २१० कारवाईची नोंद

होळी / धुलीवंदन सण असल्याने बरेच लोक मदयपान करून नशेत वाहन चालवित असतात. त्यामुळे होणाऱ्या अपघातांना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली साततत्याने नागपुर ग्रामीण जिहयातील सर्व पोलीस स्टेशन, जिल्हा वाहतूक शाखा यांच्या वतीने मुख्य मार्ग, महामार्ग आणि मुख्य चौकांत मद्यपी वाहन चालकांना आवर घालण्यासाठी ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कारवाई बाबत ३ दिवस विशेष मोहीम राबविण्यात आली आहे. **सदर मोहीमेअंतर्गत दिनांक ०२/०३/२०२६ रोजी एकूण ५६ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस, दिनांक ०३/०३/२०२६ रोजी एकूण १२२ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस आणि दिनांक ०४/०२/२०२६ रोजी १८:०० वाजे पर्यंत ३२ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस अशा एकुण २१० केसेस करण्यात आल्या आहेत.**

उपरोक्त दारूचे सेवन करून वाहन चालक मिळून आल्याने त्यांच्यावर मोटार वाहन कायदा कलम १८५, १८४, १३०, २०७ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. संपुर्ण जिल्हयातील नागरिकांनी वाहन चालवितांना वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे ,मद्यप्राशन करून वाहन चालवू नये आणि अपघातास बळी पडू नये असे आव्हान नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

## मा.प्रथमवर्ग न्यायालय उमरेड यांनी ४ आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला

मा. दिवाणी न्यायधीश, वरीष्ठ स्तर तथा प्रथमवर्ग न्यायधीश उमरेड श्री आर. बी. डोळे यांनी ४ आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर आरोपी यांच्यावर न्यायालयात खटला सुरू असुन ते न्यायालयात हजर येत नसल्याने त्यांना हजर होण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे अन्यथा त्यांचे वर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

**आरोपी नामे १) शेख शब्बीर शेख रहीम, वय २५ वर्षे, रा. मोठा ताजबाग, नागपुर, २) शब्बीर शहा रउफ शाह, रा आझादनगर झोपडपट्टी, मोठा ताजबाग, नागपुर, ३) रहमान खान अब्बास खान, वय १९ वर्षे, रा मोठा ताजबाग, मकबुल किराणा दुकानाजवळ ,नागपुर आणि ४) सलीम खान शैनशाह खान, वय २० वर्षे, रा. शिक्षक कॉलनी, झोपडपट्टी, उमरेड रोड, नागपुर** याचे वर सन २०११ मध्ये पोलीस स्टेशन बेला येथे कलम १४७,१४८,१४९,३२४,३२५,४२७ भादवि अन्वये गुन्हा नोंद असुन सदर गुन्हयचा खटला मा. प्रथमवर्ग न्यायालय, उमरेड येथे सुरू असुन सदर आरोपींना वारंवार आदेश देवुन सुध्दा आरोपी सुनावणीदरम्यान मा. न्यायालयात हजर होत नसल्याने मा.दिवाणी न्यायधीश, वरीष्ठ स्तर तथा प्रथमवर्ग न्यायधीश उमरेड यांनी सदर आरोपीतांविरूद कलम ८२ फौजदारी प्रक्रीया संहीता अन्वये जाहीरनामा काढला असुन सदर सर्व आरोपींना ला कोर्टात ०९/०३/२०२६ रोजी हजर होण्याबाबत आदेशित केले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ५१ हजार ९२० रूपयाचा मुद्देमाल जप्त, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, कार्यालय यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर** :— दिनांक ०३/०३/२०२६ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, कार्यालय येथील पोलीस अंमलदार हे अवैध धंदयावर कारवाई करणेकामी सावनेर परिसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **ॲक्टीवा मोपेड वाहनाने अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ वार्ड क्र. १, पाटणसावंगी येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान ॲक्टीवा गाडी एम एच ४० सी एल ६७२३ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता गाडीच्या डीक्कीत एका पिशवीमध्ये देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे सुजल रमेश बोकडे, वय २१ वर्ष, रा. पाटणसांवगी, वार्ड क्र. १ सावनेर हा अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २४ निपा किंमती १,९२०/— रूपये, ॲक्टीवा गाडी एम एच ४० सी एल ६७२३ किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५१,९२०/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ५३ हजार ६०० रूपयाचा मुद्देमाल जप्त, पोलीस स्टेशन भिवापूर यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०३/०३/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मोटरसायकलने **अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ सिद्धार्थ नगर, भिवापूर येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बजाज पल्सर क्र.एम. एच. ३१/सी. सी. ११२३ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता देशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे १) रोहीत राजेश पाटील, वय २५ वर्ष, रा. सिद्धार्थ नगर भिवापूर २) तुषार राजेश पाटील, वय २३ वर्ष, रा. सिद्धार्थनगर, भिवापूर हे अवैधरीत्या देशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष १) देशी दारूच्या २० निपा किंमती ३६००/— रूपये, बजाज पल्सर क्र. एम. एच. ३१ सी. सी. ११२३ किंमती ५०,०००/—रू असा एकुण किंमती ५३,६००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०७ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. देवलापार पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन देवलापार** :— दिनांक ०३/०३/२०२६ रोजी देवलापार पोलीसांना गुप्त बातमीदारां मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सालई जंगल शिवार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस

घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता **आरोपी नामे १) सचीन अशोकराव वरखडे, वय ३६ वर्ष, २) महेन्द्र शेषराव वरखडे, वय २५ वर्ष ३)सेवक किशन पीलगेर, वय २५ वर्ष ४)गगन दिलीप पीलगेर, वय २६वर्ष ५) रवीद्र जमनाप्रसाद राउत, वय २९ वर्षे ६)प्रदीप हरीचंद भारसाकरे, वय ३०वर्षे ७) रविद्र प्रवीन राउत, वय २७ वर्षे वरील सर्व रा. सालई ता. रामटेक हे ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना जागीच मिळुन आले.** आरोपीतांच्या **ताब्यातुन** ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम असा एकूण १०३०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन देवलापार येथे १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणाऱ्या, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ४० गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत दिनांक ०३/०३/२०२६ रोजी विशेष मोहीम राबवुन दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारू तसेच वाहन व साहित्य असा **एकुण १,२५,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.** तसेच मदयपान करून वाहन चालविणाऱ्यावर एकुण १२२ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस करण्यात आल्या आहेत.

**पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत ०५** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत १०** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत** ०२ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही अंतर्गत ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापूर अंतर्गत ०४** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतूर अंतर्गत ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत ०४** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत ०२** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत ०४** गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत ०१** गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन**

**बोरी अंतर्गत ०३** गुन्हे नोंद आहे. असे एकुण **महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ४० गुन्हे दाखल केले आहे.**

**सदर कारवाईत ९९१८०मिली देशी दारू, २४७२० मिली विदेशी दारू, ८७ लीटर मोहाफुल दारू तसेच वाहन व इतर साहित्य असा एकुण १,२५,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने